सायं दैनिक
नांदेड अपडेट

नांदेड ■ शुक्रवार, दि. ५ मार्च २०२१ ■ वर्ष १ ले ■ अंक १४ वा ■ पाने-४ ■ किंमत २ रूपये




# देगलूर महाविद्यालयाच्या मनीषा वनंजेची लोकप्रशासन अभ्यास मंडळ सदस्यपदी नियुक्ती

**नांदेड अपडेट प्रतिनिधी**

देगलूर - महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ मधील तरतुदीनुसार विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत सर्व प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास त्या विषयाच्या अभ्यास मंडळाचे सदस्य म्हणून काम करण्याची संधी मिळते. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायद्यातील तरतुदीनुसार स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या एम. ए. लोकप्रशासन या विषयात देगलूर महाविद्यालयाची विद्यार्थिनी कु.मनीषा वनंजे ही गुणवत्ता यादीत सर्वप्रथम आली आहे. त्यामुळे तीला नांदेड विद्यापीठाच्या लोकप्रशासन अभ्यास मंडळाचे सदस्य म्हणून काम करण्याची संधी मिळाली आहे.



मनीषा वनंजे प्राप्त केलेल्या गुणवत्तेबद्दल व विद्यापीठ लोकप्रशासन अभ्यास मंडळाच्या सदस्यपदी नियुक्तीबद्दल कु. मनीषा वनंजे हिचे अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील बेंबरेकर, संस्थेचे सचिव शशिकांत चिद्रावार , उपाध्यक्ष नारायणराव मैलागीरे, सहसचिव सुर्यकांत नारलावार, कोषाध्यक्ष विलास तोटावार व कार्यकारिनी मंडळ सदस्य राजूकुमार महाजन, डॉ कर्मवीर उंग्रतवार, देवेंन्द्र मोतेवार गंगाधर जोशी, जनार्दन चिद्रावार, रवींद्र अप्पा द्याडे. भगवान पा. भायेगावकर, चंद्रकांत नारलावार, नारायणराव ताड़कोले, प्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार, ऊपप्राचार्य डॉ. प्रकाश कद्रेकर, ऊपप्राचार्य निवृती गोविंदवार, लोकप्रशासन विभाग प्रमुख डॉ. बी.आर. कतुरवार , डॉ.एस.एम.देबडे व कार्यालय अधीक्षक गोविंद जोशी यांनी आभिनंदन केले आहे.